पुढारी
शुक्रवार
३१ ऑगस्ट २०१८

विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची जिल्हा पोलिस मुख्यालयास भेट

कोल्हापूर (प्रतिनिधी) : विवेकानंद महाविद्यालय राज्यशास्त्र विभागाच्या ४० विद्यार्थ्यांनी कोल्हापूर जिल्हा पोलिस मुख्यालयास भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी पासपोर्ट विभाग, महिला तक्रार कक्ष, नियंत्रण कक्ष, आर्थिक गुन्हेगारी शाखा, स्थानिक गुन्हे शाखांचे प्रत्यक्ष कामकाज पाहिले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे निरसन करण्यात आले. यावेळी पोलिस उपअधीक्षक सतीश माने, पोलिस उपनिरीक्षक प्रदीप ठाकूर यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र टाइम्स

वीस ठिकाणी सायलेंट झोन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

महानगरपालिकेच्या कार्यकक्षेतील शैक्षणिक संस्था, न्यायालये, मोठी रुग्णालये व धार्मिक स्थळ अशी २० ठिकाणे शांतता क्षेत्र (सायलेंट झोन) म्हणून घोषित केली आहेत. या ठिकाणांच्या सभोवताली शंभर मीटर क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे ध्वनीप्रदूषण करू नये असे आवाहन महापालिकेच्या पर्यावरण विभागाने केले आहे.

या क्षेत्रामध्ये ध्वनी मर्यादा सकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत ५० डेसीबल व रात्री दहा ते सकाळी सहापर्यंत ४० डेसीबल ठेवायची आहे. सीपीआर, आयसोलेशन हॉस्पिटल, डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, आधार हॉस्पिटल, डॉ. प्रभू हॉस्पिटल, मेरी वॉन्लेस हॉस्पिटल,

जिल्हा व सत्र न्यायालय, फौजदारी कोर्ट (फास्ट ट्रॅक), जिल्हा ग्राहक न्यायालय, अंबाबाई मंदिर, बाबूजमाल मस्जिद, वायल्डर मेमोरियल चर्च, टेंबलाई मंदिर, शिवाजी विद्यापीठ, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल व इंजिनीअरिंग कॉलेज, विवेकानंद कॉलेज, स.म. लोहिया हायस्कूल, पदमाराजे हायस्कूल, महाराष्ट्र हायस्कूलचा यात समावेश आहे. ध्वनीमर्यादेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन आहे.

तरुण भारत

रक्तदान सर्वश्रेष्ठ जीवनदान : प्राचार्य अभयकुमार साळुंखे

कोल्हापूर : समाजामध्ये विविध आरोग्य विषयक कारणांनी रक्ताची गरज भासू लागली आहे. सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीयत्व जपण्यासाठी, बंधूभावाची प्रेरणा जागरूक करण्यासाठी रक्तदान करणे गरजेचे आहे. त्यामुळे रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेज शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर डॉ. एस. जी. गावडे, प्रा. संदिप पाटील प्रा. एच. पी. पाटील, प्रा. सुनीता भोसले आदी उपस्थित होते.